दै. ॲग्रोवन दि. 05/09/2021

# मिरजेत फुलांचे होणार ऑनलाइन लिलाव

## सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना लाभ




ॲग्रोवन वृत्तसेवा

**मिरज, जि. सांगली : सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांसह शेजारील कर्नाटक राज्यातील बेळगाव आणि विजापूर या दोन जिल्ह्यांतून मिरजेला फुलांच्या विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना आता ऑनलाइन पद्धतीने आपली फुले विकता येणार आहेत. त्यासाठी मिरज येथील दुय्यम बाजार आवारात शीतगृह आणि ऑनलाइनसाठीच्या तांत्रिक सुविधांचे काम अंतिम टप्प्यात आहे.**

या ऑनलाइन लिलाव पद्धतीमुळे शेतकऱ्यांना फुलांचे पैसे चांगले मिळतीलच, शिवाय अनेक लांबच्या व्यापाऱ्यांनाही चांगल्या दर्जाची फुले विकत घेता येणार आहेत. या दुहेरी सोईमुळे येत्या काही महिन्यांत मिरजेचा फुलांचा ऑनलाइन बाजार राज्यातच नव्हे, तर कदाचित देशात अव्वल स्थान मिळवू शकतो. पान ४ वर »

### बंगळूरच्या धर्तीवर ऑनलाइन फुलाचे सौदे



- एका हॉलमधील स्क्रीनवर फुलांचे प्रकार आणि त्याला क्रमांकासह बारकोड दिला जाणार
- फुलांचा क्रमांक आणि बारकोड व्यापाऱ्याच्या मोबाईलवर दिसणार
- ऑनलाइन सौद्याबाबत व्यापारी आणि शेतकरी यांना सविस्तर माहिती दिली जाणार
- २५ पेक्षा अधिक व्यापाऱ्यांना होता येणार सहभागी
- सौद्यासाठी ५ ते १० मिनिटांचा कालावधी
- त्यानंतर खरेदीसाठी क्रमांक निवडल्यानंतर सौदा पूर्ण होणार



**“ निर्यातक्षम बेदाण्याच्या निर्मितीनंतर आता मिरज पूर्व भागातील शेतकरी फुलांच्या उत्पादनात अग्रभागी दिसेल. सातत्याने नावीन्यपूर्ण प्रयोग करून पिकविलेल्या फुलांना देशभरातून चांगले मार्केट मिळू शकते. त्यासाठी शीतगृहाची मिरजमध्ये उभारणी केली. देशभरातील व्यापारी यामध्ये सहभागी होतील. अधिकाधिक दर शेतकऱ्यांना मिळवून देण्यासह, मिरज हे येत्या काही महिन्यांत फुलांच्या व्यापारात अव्वल स्थानी असेल.**

– दिनकर पाटील, सभापती, सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती

**“ मिरज पूर्व भागात बरेच शेतकरी फुलांची शेती करत आहेत. फुलांना दर चांगला मिळण्यासाठी अशा ऑनलाइन लिलाव पद्धतीची नितांत आवश्यकता होती. यामुळे परगावचे व्यापारी सहभागी होऊन शेतकऱ्यांना अधिकाधिक दर मिळण्यास मदत होईल. त्यामुळे मिरजेतील ऑनलाइन सुविधेचे स्वागत आहे.**

– राजेंद्र कोल्हापुरे, फूल उत्पादक शेतकरी, मालगाव

# मिरजेत होणार फुलांचे ऑनलाइन लिलाव

» पान १ वरून

गेल्या अनेक वर्षांपासून मिरजेच्या मार्केट यार्डात फुलांचे लिलाव नियमितपणे होतात. यामध्ये शेतकरी फुले घेऊन येतात आणि व्यापारी नेहमीच्या लिलाव पद्धतीने शेतकऱ्यांची फुले विकत घेतात. व्यापारी संख्येने कमी येत असल्याने बऱ्याच वेळा शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत नाही. सध्या तर मंदिरे बंद आहेत. लग्नांना सजावटींना परवानगी नाही. त्यामुळे फुलांचा वापरच कमी झाल्याने व्यापारीही जास्त दराने फुले खरेदी करू शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी मिरज मार्केट समितीने जास्तीत जास्त व्यापाऱ्यांना निमंत्रित केले. पण त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. साहजिकच बंगळूरच्या मार्केटप्रमाणे ऑनलाइन पद्धतीने फुले विकल्याशिवाय शेतकऱ्यांना दर मिळू शकत नाही, हे लक्षात आल्यानंतरच ऑनलाइन पद्धतीने लिलावाची सुविधा मिरजमध्ये सुरू करण्याचा निर्णय संचालकांनी घेतला आणि सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिनकर पाटील आणि मिरज दुय्यम बाजार आवाराचे सभापती वसंतराव गायकवाड यांनी मिरजेच्या दुय्यम बाजार आवारात तातडीने शीतगृह उभारण्यासह शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याचे ठरवून तयारी केली, जी सध्या अंतिम टप्प्यात आहे.

**पन्नासहून अधिक गावांमधून आवक**

येथील श्यामराव बंडुजी पाटील दुय्यम बाजार आवारात नियमितपणे मिरज शहराजवळील, सुमारे वीसहून अधिक गावे तर कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील सात गावे, तसेच सोलापूर जिल्ह्यातील आणि शेजारील कर्नाटकातील विजापूर, बेळगाव जिल्ह्यांतील अनेक गावांमधूनही शेतकरी फुले विक्रीसाठी घेऊन येतात. तर खरेदीसाठी पंढरपूर, कोल्हापूर, नृसिंहवाडी, विजापूर, गुलबर्गा, विटा, तासगाव येथील व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने मिरजेला येतो. नियमितपणे झेंडू, शेवंती, गलाटा, लिली, निशिगंध, गुलाब, कार्नेशन, जरबेरासह अन्य विविध प्रकारची फुले मिरजेला येत असल्याने मिरजेतील फुलांचा व्यापार अधिकाधिक वाढत आहे.

दै. "पुढारी" दि. २२/९/२०२१

# बाजार समित्या सक्षमीकरणासाठी ५०० कोटी रुपयांची गरज

## समित्यांना ७५ टक्के अनुदान मिळणार

**मुंबई : नरेश कदम**

राज्यातील बाजार समित्या आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्याचे ठरवले आहे. राज्यातील बाजार समित्या आणि उपसमित्यांना या योजनेतून ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

राज्यात ३०६ बाजार समित्या आणि ६०८ उपसमित्या आहेत. बाजार समित्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने कृषी पणन महामंडळाचे संचालक सतीश सोनी आणि पणन महामंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांच्या समितीने आपला अहवाल सादर केला. तसेच या अहवालाचे सादरीकरण अर्थमंत्री अजित पवार आणि सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे करण्यात आले.

बाजार समित्यांमध्ये पायभूत सुविधा उभारण्यासाठी ही योजना आहे. १ कोटी रुपयांपेक्षा जास्त बजेट असलेल्या समित्यांना ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. तर उर्वरित २५ टक्क्यांपैकी १० टक्के रक्कम बाजार समितीला द्यावी लागेल, तर १५ टक्के निधी कर्जातून उभारायचा आहे.

दै. "ॲग्रोवन" दि. २५।९।२०२१.

# बांगलादेशला रेल्वेद्वारे होणार संत्रा निर्यात

ॲग्रोवन वृत्तसेवा

नागपूर : किसान रेल्वेच्या माध्यमातून संत्रा उत्पादक तसेच निर्यातदारांना कमी खर्चाचा आणि वेळेची बचत करणारा वाहतुकीचा पर्याय उपलब्ध झाला आहे. नागपुरी संत्र्याची बांगलादेशला सर्वाधिक निर्यात होते. त्या पार्श्वभूमीवर रेल्वे अधिकारी, निर्यातदारांनी बांगलादेश सीमेनजीकच्या स्थानकांची पाहणी केली.

विदर्भात नागपूर संत्रा खालील सर्वाधिक क्षेत्र आहे. सुमारे एक लाख ३५ हजार हेक्टर क्षेत्रावर संत्रा आहे. त्यापासून सुमारे सात लाख टन फळांचे उत्पादन होते. त्यातील सुमारे दीड लाख टन संत्र्याची बांगलादेशला निर्यात केली जाते. यापूर्वी संत्रा निर्यातीकरिता रस्ते वाहतुकीचा एकमेव पर्याय उपलब्ध होता. यामध्ये बांगलादेशला संत्रा पोहोचण्यास बराच कालावधी लागतो. संत्र्यांची टिकवणक्षमता कमी असल्याने संत्रा खराब होण्याची देखील भीती राहते. त्यासोबतच रस्ते वाहतुकीच्या माध्यमातून संत्रा निर्यात केल्यास प्रति टन ५००० रुपये इतका प्रचंड खर्च होतो.



गेल्या वर्षीपासून किसान रेल्वेचा पर्याय शेतकरी व निर्यातदारांना उपलब्ध करून दिला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून किसान रेल्वेच्या माध्यमातून होणाऱ्या शेतमाल वाहतुकीसाठी अनुदानदेखील उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे शेतकरी व निर्यातदारांना मोठा दिलासा मिळाला. परिणामी गेल्या वर्षीच्या हंगामात देशाअंतर्गत १८०० टन संत्रा वाहतूक रेल्वेच्या माध्यमातून झाली. शालिमार तसेच आझादपूर मंडी दिल्लीमध्ये हा संत्रा पाठविण्यात आला होता. या वर्षीदेखील किसान रेल्वेचा पर्याय संत्रा वाहतूकदारांना उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्याकरिता रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी वरुड येथे संत्रा निर्यातदार यांची बैठक घेतली. त्यामध्ये या वर्षीच्या हंगामात जास्तीत जास्त संत्रा देशातील बाजारपेठांसोबतच बांगलादेशला निर्यात व्हावा यासाठी सर्वांनी सामूहिकपणे प्रयत्न करावे, असे आवाहन रेल्वेने केले आहे. त्या पार्श्वभूमीवर बांगलादेश नजीकच्या बनगाव, जेडे, बेनापोल स्थानकांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यासोबतच कस्टम क्लीअरिंगसाठी असलेल्या टेट्रापोल भागालाही भेट देण्यात आली.

## बनगाव रेल्वे स्टेशनचा पर्याय

शेतीमाल वाहतुकीकरिता भारतीय हद्दीपर्यंतच किसान रेल्वेच्या माध्यमातून अनुदान दिले जाते. गेल्या वर्षी बांगलादेशमधील बेनापोल स्थानकापर्यंत संत्रा वाहतूक करण्याचे प्रस्तावित होते. परंतु या ठिकाणी रेक खाली करण्याची सुविधा पर्याप्त नाही. त्यामुळे अन्य स्थानकांची चाचपणी केली जात होती. पश्चिम बंगालमधील बनगाव स्थानक हे बांगलादेशपासून अवघ्या सात किलोमीटर, तर जेडे स्थानक हे अवघ्या १३ किलोमीटर अंतरावर आहे. यातील जेडे स्थानकावर संत्रा खाली करण्यासाठीच्या सुविधा पर्याप्त आहेत. त्यामुळे या स्थानकाबाबत रेल्वे प्रशासन सकारात्मक असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या ठिकाणी संत्रा पोहोचल्यानंतर तेथून ट्रकद्वारे बांगलादेशला पाठविण्यात येईल. रेल्वे अधिकारी व निर्यातदारांनी गुरुवारी (ता. २३) या भागात भेट दिली. स्थानकावरील सुविधांचा आढावा घेतल्यानंतर लवकरच किसान रेल्वे सुरू करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाणार आहे.

**“ सध्या भारतीय हद्दीपर्यंत होणाऱ्या वाहतुकीसाठी किसान रेल्वेच्या माध्यमातून अनुदान दिले जाते. अनुदान बांगलादेश संत्रा निर्यात करणाऱ्या शेतकरी व व्यापाऱ्यांना देण्यात आल्यास मोठा फायदा होणार आहे याबाबत केंद्र सरकारने पुढाकार घेतला पाहिजे.**

**-रमेश जिचकार,**
सचिव, इंडो-बांगला
ऑरेंज एक्स्पोर्टर असोसिएशन

दै. "अॅग्रोवन" दि. २६।९।२०२२.

# युरोपियन देशांत शेतीमाल पाठविण्यासाठी 'पणन'चा पुढाकार

## कार्यकारी संचालक सुनील पवार यांची 'महाएक्स्पो'त माहिती

**अॅग्रोवन वृत्तसेवा**




**मुंबई : येथील वर्ल्ड ट्रेंड सेंटरमध्ये महाएक्स्पो कॉनक्लेव्हमध्ये महाराष्ट्रातील शेतीमालाच्या निर्यातीचे सादरीकरण राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी केले.**

पुणे : भारतातून होणारी केळीची निर्यात १९७०मध्ये खंडित झाली होती. ही निर्यात पणन मंडळाच्या प्रयत्नांतून १९९९मध्ये पुन्हा सुरू करण्यात आली आहे. आता ही निर्यात सहपटींनी वाढली असून, पणन मंडळाच्या विविध २४ निर्यात सुविधा केंद्रांवरून १ लाख ७५ हजार टन शेतीमालाची हाताळणी आणि निर्यात झाली आहे. भविष्यात शेतकऱ्यांना परदेशी चलन प्राप्तीसाठी युरोपियन देशांसह अमेरिका, कॅनडासारख्या विकसित देशांमध्ये फळे भाजीपाला निर्यातीसाठी पणन मंडळ प्रयत्न करणार असल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी सांगितले.

देशाच्या स्वातंत्र्याला ७५वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या वतीने मुंबई येथील वर्ल्ड ट्रेंड सेंटरमध्ये महाएक्स्पो कॉनक्लेव्हचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पवार यांच्यासह पणन मंडळाचे निर्यात विभागाचे प्रमुख सतीश वराडे यांनी सादरीकरण केले.

### जीआय प्रोत्साहनासाठी स्वतंत्र योजना

निर्यातवाढीसाठी राज्यातील विविध २४ पिकांना भौगोलिक निर्देशांक मिळाला आहे. या उत्पादनांच्या प्रभावी विपणन आणि निर्यातीसाठी पणन मंडळाने स्वतंत्र योजना आखली आहे. यामध्ये संबधित पिकाचे ब्रॅण्डिंग, पॅकिंग, विपणन यासाठी प्रोत्साहन दिले जात असल्याची माहिती निर्यात विभाग प्रमुख सतीश वराडे यांनी सादर केली.

या वेळी पवार म्हणाले, "महाराष्ट्र फळे भाजीपाला उत्पादनामध्ये आघाडीवर आहे. शेतकरी विविध प्रयोग आणि तंत्रज्ञानाच्या वापरातून निर्यातक्षम शेतीमालाचे उत्पादन घेत आहे. मात्र अनेक वेळा स्थानिक आणि देशांतर्गत बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठ्याच्या व्यस्त प्रमाणामुळे शेतीमालाचे दर कोसळतात. या दर्जेदार आणि निर्यातक्षम शेतीमालाच्या निर्यातीमधून शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी पणन मंडळाच्या वतीने विविध भागांमध्ये शेतमालनिहाय निर्यात सुविधा केंद्रे उभारली आहेत. तर शेतीमालनिहाय संघ स्थापन करून निर्यातीला चालना दिली आहे."

दै. "पुढारी" दि. २८/९/२०२२.

# कृषिमाल निर्यात वाढविण्याची गरज

## पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांचे मत




महा एक्स्पो संमेलनात बोलताना पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार व उपस्थित मान्यवर.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशातून होणारी कृषिमालाची निर्यात प्रामुख्याने आशियाई देश आणि शेजारील देशांना होत आहे. परंतु, शेतकऱ्यांना व निर्यातदारांना चांगला परतावा मिळण्यासाठी युरोपियन देश, अमेरिका, कॅनडा आदींसह विकसित देशांनाही कृषिमाल निर्यात वाढविण्याची आवश्यकता असल्याचे मत राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी केले.

देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयामार्फत 'आझादी का अमृत महोत्सव' साजरा केला जात आहे. यामध्ये वाणिज्य विभागाकडून २० ते २६ सप्टेंबर या कालावधीत वाणिज्य सप्ताह साजरा केला जात आहे. या बाबत मुंबई येथील वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे नुकत्याच आयोजित महा एक्स्पो कॉन्कलेव्हचे आयोजन करण्यात आले होते.

कृषि उत्पादनांच्या चर्चासत्रामध्ये केंद्राच्या वतीने अपेडा, स्पायसेस बोर्ड आदी संस्थांनीतरराज्याच्यावतीनेफळे, भाजीपाला व प्रक्रियायुक्त खाद्य पदार्थांकरिता राज्य कृषि पणन मंडळाने सहभाग घेतला. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमास मंडळाचे निर्यात विभागाचे व्यवस्थापक सतिश वराडे, अपेडाचे प्रशांत वाघमारे, एमपेडाचे डॉ. श्रीनाथ, स्पायसेस बोर्डाचे डॉ. दिनेश सिंग बिस्ट यांच्यासह आय.एन.आय.फार्मच्या पूर्णिमा खंडेलवाल, सी ग्रीन ऑरगॅनिकच्या देवांशी ब्रम्हाभट्ट आदि उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातून शेतमाल निर्यात वाढविण्यात राज्य कृषी पणन मंडळाने नेहमीच योगदान दिलेले आहे. मंडळाच्या प्रयत्नांमुळे १९९९ पासून केळी निर्यातीस वेग आला. जागतिक बाजारात केळी निर्यात करणाऱ्या काही कंपन्यांशी टक्कर देत गेल्या सहा वर्षात केळी निर्यातीत सहापट वाढ झाली असून हा एक विक्रम आहे. मंडळाने द्राक्ष निर्यातदार शेतकऱ्यांसाठी महाग्रेप्स ही संस्था स्थापन केली. राज्यातून द्राक्षांसह डाळिंब, आंबा, संत्रा, केळी, कांदा आदी पिकांच्या निर्यातीमध्ये राज्याने भरीव कामगिरी केली आहे.

दै. "ॲग्रोवन" दि. २५/३/२०२१.

# केळी, संत्रा क्लस्टरमध्ये वर्ध्याचा समावेश

## कृषी निर्यात धोरणांतर्गत मिळणार चालना; केळी लागवडीकडे वळविण्यासाठी प्रयत्न

ॲग्रोवन वृत्तसेवा

वर्धा : केंद्राच्या धर्तीवर राज्याने निर्यात धोरण तयार केले आहे. त्याअंतर्गत संबंधित शेतीमालाचे सर्वांत जास्त उत्पादन असलेल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली क्लस्टरनिहाय 'क्लस्टर फॅसिलिटेशन सेल' स्थापन करण्यात आले आहे. एकूण २७ क्लस्टरमधील केळी व संत्रा क्लस्टरमध्ये वर्धा जिल्ह्याचा समावेश करण्यात आला असून, आता वर्धा जिल्ह्यातील उत्तम दर्जेदार केळी निर्यात होण्यास चालना मिळणार आहे.

वर्धा जिल्हा केळी उत्पादनात अग्रेसर ठरावा म्हणून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना केळीच्या शेतीचे कृषी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व विक्री व्यवस्थेसाठी जिल्हा प्रशासनाकडून साह्य करण्यात येणार आहे. जिल्ह्यातून केळी निर्यातीला प्रोत्साहन देण्यासोबतच केळी लागवडीकडे शेतकऱ्यांना वळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

> **जिल्ह्यात २० वर्षांपूर्वी सेलू तालुक्यात केळी पिकाचे भरपूर उत्पादन होत होते. परंतु कालांतराने केळीच्या पिकाकडे कल कमी झाल्याने केळी उत्पादनात जिल्हा माघारला. केळीच्या लागवडीसाठी जिल्ह्यात पोषक वातावरण व जमीन आहे तसेच येथील केळी दर्जेदार असल्यामुळे निर्यातक्षम आहेत. जिल्ह्यात केळीसाठी नवीन केळीचे 'क्लस्टर फॅसिलिटेशन सेल' उभारणी होत असल्याने जिल्हा पुन्हा केळी उत्पादनात अग्रेसर ठरेल.**
> **– अनिल इंगळे,** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वर्धा



जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे केळी क्लस्टर सुविधा सेलचे अध्यक्ष राहणार असून, संबंधित शेती उत्पादन घेणारे जिल्हे क्लस्टरमध्ये समाविष्ट राहतील. तसेच संत्रा क्लस्टरसाठी अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असणार आहेत. जिल्ह्यात काही वर्षांपूर्वी सेलू तालुक्यात केळी फळपिकाचे भरघोस उत्पादन घेण्यात येत होते. तालुक्यातील केळी ही उत्तम दर्जाची असल्यामुळे या ठिकाणाहून राज्यात सर्वत्र केळी विक्रीसाठी पाठविली जात होती. एवढेच नव्हे तर येथून केळी लागवडीसाठी कंदसुद्धा इतर जिल्ह्यांत पाठविण्यात येत होते.

सद्यःस्थितीत जिल्ह्यात केळी लागवडीचे क्षेत्रफळ २४३ हेक्टर असून, सेलू तालुक्यासह इतर तालुक्यांतही केळी उत्पादनवाढीसाठी क्लस्टरनुसार महत्त्वपूर्ण काम हाती घेण्यात येणार आहे. क्लस्टरनिहाय क्लस्टर फॅसिलिटेशन सेलमध्ये जिल्हाधिकारी अध्यक्ष, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, 'आत्मा'चे प्रकल्प संचालक, जिल्हा उपनिबंधक, राष्ट्रीय संशोधन केंद्र, संबंधित कृषी विद्यापीठाचे प्रतिनिधी, कृषी विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी तसेच संबंधित पिकाचे उत्पादन घेणारे प्रगतशील शेतकरी किंवा शेतकरी उत्पादक कंपनी आदी सदस्य राहणार आहेत.



दै. "अॅग्रोवन" दि. ३०।९।२०२१.

# अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला ‘जीआय’

## बाजारपेठ मिळवणे शक्य; वाडा कोलम भातासही अटींवर जीआय

मंदार मुंडले : अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : रायगड जिल्ह्यात शंभर वर्षांच्याही आधीपासून लागवडीची परंपरा जोपासलेल्या अलिबागच्या गोड, पांढऱ्या कांद्याला बुधवारी (ता. २९) भौगोलिक निर्देशांक (जीआय) देण्याबाबत केंद्र सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून मौखिक स्वीकृती देण्यात आली आहे.

अलिबाग पांढरा कांदा उत्पादक संघाच्या नावाने जीआय प्राप्त झाला असून, या यशामुळे अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांना आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कांद्याला देशासह जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवणे शक्य होणार आहे. डहाणू, पालघर भागातील प्रसिद्ध वाडा कोलम या भातालाही काही अटींवर जीआय स्वीकृत करण्यात आला आहे. महाराष्ट्रात होणाऱ्या कांद्यांच्या विविध प्रकारांपैकी अलिबागच्या पांढऱ्या कांद्याने आपले वेगळे वैशिष्ट्य जपले आहे. मोत्यासारखा पांढरा शुभ्र, मोदकासारखा आकर्षक आकार, गोड चवीचा व विविध औषधी गुणधर्मांनी युक्त म्हणून या कांद्याची ओळख आहे. अलीकडील काळात ग्राहकांकडून म्हणूनच या कांद्याला पसंती मिळू लागली आहे.

**ऐतिहासिक वारसा व ‘जीआय’चे प्रयत्न**

अलिबाग तालुक्याचे लागवडीखालील एकूण क्षेत्र १४ हजार ते १५ हजार हेक्टर आहे. पैकी पांढऱ्या कांद्याखालील क्षेत्र २२० ते २३० हेक्टर आहे. ‘बॉम्बे प्रेसिडेन्स-कुलाबा’ गॅझेटच्या सन १८८३ च्या मूळ प्रतीत व सन २००६ च्या ‘ई बुक’ आवृत्तीत अलिबागमध्ये पांढरा कांदा लागवडीखाली असल्याचे ऐतिहासिक संदर्भ देण्यात आले आहेत. वाडवडिलांच्या आधीपासून येथील शेतकऱ्यांनी त्याचे शुद्ध बियाणे संवर्धित केले आहे. सात- आठ गावे पांढऱ्या कांद्याच्या लागवडीसाठी प्रसिद्ध असून, उत्पादकांची संख्या सहाशेहून अधिक आहे. अशा या कांद्याला भौगोलिक निर्देशांक (जीआय) मिळविण्यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रायगड कृषी विभाग व पुणे येथील ‘जीएमजीसी’ कंपनीचे प्रमुख गणेश हिंगमिरे यांनी सामंजस्य करार केला होता. एकत्रित प्रयत्नांमधून १५ जानेवारी २०१९ ला ‘जीआय’साठी नोंदणी झाली. अलिबाग पांढरा कांदा उत्पादक संघही स्थापन करण्यात आला.

> वाडवडिलांच्या काळापासून आम्ही सर्व शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पांढरा कांदा आजपर्यंत जोपासला आहे. जीआय स्वीकृती मिळाल्याने आनंद तर झालाच, शिवाय हुरूपही वाढला आहे. सर्वांच्या एकत्रीकरणातून हे शक्य झाले आहे. अधिकाधिक ग्राहकांपर्यंत या कांद्याचा प्रसार झाल्यास मागणी वाढून दरही चांगले मिळतील.
> **– सचिन पाटील,** अध्यक्ष, अलिबाग पांढरा कांदा उत्पादक संघ



**अखेर ‘जीआय’वर शिक्कामोर्तब**

बुधवारी (ता. २९) मुंबई येथील केंद्र सरकारच्या पेटंट रजिस्ट्रार कार्यालयात जीआय मिळण्याच्या दृष्टीने पडताळणी करण्यात आली. या वेळी कृषी विद्यापीठाच्या भौगोलिक निर्देशांक (जीआय) प्रकल्पाचे प्रमुख डॉ. जितेंद्र कदम, ‘आत्मा’चे कल्पेश पाटील, जीएमजीसीचे प्रमुख गणेश हिंगमिरे व शेतकरी उत्पादक संघाचे शेतकरी सदस्यही उपस्थित होते.

**वाडा कोलमलाही ‘जीआय’**

डहाणू, पालघर भागांतील वाडा कोलम या पारंपरिक भातालाही बुधवारी (ता. २९) काही शर्तींवर जीआय स्वीकृती देण्यात आली आहे. त्यासाठी जीआय प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या काही बाबींचे संदर्भपुरावे एक महिन्याच्या आत पेटंट कार्यालयाकडे सुपूर्द करण्याबाबत सांगण्यात आले आहे.